# निर्णय निर्मिती दृष्टीकोण (Decision making approach)

## प्रस्तावना:-(introduction)

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये निर्णय निर्मिती सिद्धांताचा सर्वप्रथम वापर रिचर्ड स्नाईडर, एच डब्ल्यू ब्रूक व बरटोन स्पिन या अभ्यासकांनी केला. त्यांचा उद्देश आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांच्या क्रिया-प्रतिक्रिया यांना प्रभावित करणाऱ्या घटकांचे स्पष्टीकरण करणे हा होता.

Edit with WPS Office

# अर्थ व स्वरूप (meaning and nature) :-

१) रोबिन्सन च्या मते : - निर्णय निर्मिती एक सामाजिक प्रक्रिया आहे . त्यामध्ये कमीत कमी पर्यायांमधून निर्णय घेण्यासाठी एखादी समस्या निवडली जाते ,व अंमलबजावणी साठी निर्णय घेतले जातात.

Edit with WPS Office

निर्णय निर्मिती दृष्टीकोणामध्ये परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे, कार्य ,तत्त्वे ,प्रक्रिया ,साधने ,अंतर्गत व बाह्य घटकांचा समावेश होतो. आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्रांमध्ये परराष्ट्र व्यवहाराविषयी निर्णय कोण घेते ?कसा घेते ?कोणत्या परिस्थितीत घेतला जातो ?तो निर्णय कोणत्या निकषावर घेतला जातो ?अशा गोष्टींच्या विश्लेषणावर हा दृष्टीकोन भर देतो .या दृष्टिकोनात निर्णय घेण्याची विचारसरणी, भूमिका, उद्देश त्याची आर्थिक ,सामाजिक ,परिस्थिती व त्याच्यावरील दबाव याचा विचार केला जातो.

Edit with WPS Office

***<u>हर्बर्ट सायमन च्या मते</u>*** :- निर्णय घेणे हे प्रशासनातील अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. राजकारण म्हणजे अव्याहतपणे निर्णय घेण्याची शास्त्र आहे. निर्णयाची प्रक्रिया आणि त्यावरील प्रभाव पाडणाऱ्या घटकांचा आढावा पुढील प्रमाणे घेता येतो.

Edit with WPS Office

# निर्णयाची प्रक्रिया व त्यावरील प्रभाव

## १) अंतर्गत स्थिती :-

अ) राज्यातील लोकमत

ब) कायदेमंडळ कार्यकारी मंडळ

क) विज्ञान-तंत्रज्ञान व भौगोलिक स्थिती

ड) राज्यातील गट व दबाव गट

Edit with WPS Office

# प्रभावी घटक/ परिस्थिती

## २) बाह्य स्थिती :-

अ) जागतिक संघटना
ब) जागतिक लोकमत
क) सैनिक संघटना
ड) निर्णय घेणाऱ्या चे व्यक्तिमत्व
ई) सारांश

Edit with WPS Office

# निर्णय निर्मिती सिद्धांताचे टिकात्मक परिक्षण

1) निर्णय योग्य आहे का अयोग्य आहे याबाबतीत कोणताच विचार झालेला दिसून येत नाही म्हणून ही प्रक्रिया एकांगी स्वरूपाची वाटते.

२) निर्णय निर्धारण करताना राष्ट्राच्या अंतर्गत बाह्य स्थितीचा किंवा नेत्यांच्या आकलनाचा यापैकी कोणता प्रभाव अधिक असतो हे स्पष्ट सांगणे अत्यंत क्लिस्ट आहे.

Edit with WPS Office

३) भविष्यात आंतरराष्ट्रीय परिस्थितीमध्ये होणाऱ्या बदलांचा अंदाज बांधता येत नाही त्यामुळे पुढे कोणत्या परिस्थितीत कशी निर्णय घेतली जातील हे सांगणे कठीण असते परिस्थितीनुसार निर्णयात परिवर्तन होणे आवश्यक असते.

४) निर्णय घेते वेळी एका देशाला इतर देशांच्या बाबतीत जी माहिती उपलब्ध असते त्या आधारावर तो देश निर्णय निर्धारण करतो. बाह्य परिस्थितीत जर अचूक माहिती उपलब्ध झाली तर निर्णय योग्य ठरू शकतो परंतु माहिती चुकीची पुढे आली तर अशावेळी निर्णय चुकीचे ठरू शकतात. त्याचे निश्चित मोजमाप नसते.

Edit with WPS Office

५) निर्णय निर्धारण पद्धतीही शवचिकित्सा पद्धती सारखी असल्याचे टीकाकारांचे मत आहे कारण निर्णय घेण्यापूर्वी फारसा विचार होतोच असे नाही निर्णय घेऊन कृतीत उतरवल्यानंतर त्याचे चांगले-वाईट परिणाम दिसतात त्यावर आधारित पुढे चर्चा होत असते.

वरील प्रमाणे या दृष्टिकोनात काही दोष दिसून येतात परंतु आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाला हा दृष्टीकोण मार्गदर्शक ठरतो . त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधातील देशादेशातील संबंधाचा अभ्यास करण्यास मदत होते

Edit with WPS Office